

# संपादकीय

**श्री. अजय ब्रम्हेचा**
अध्यक्ष
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.

नमस्कार! आत्तापर्यंत आपल्या सर्वांची आर्थिक हिशेबपत्रके, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके पूर्ण झाली असतीलच. तसेच लेखापरीक्षणाचे कामही जवळजवळ पूर्ण होत आले असेल. गतवर्षीचा आढावा घेऊन नवीन वर्षाची अंदाजपत्रकेही तयार करुन आपण आपली भविष्यातील वाटचाल देखील निश्चित केली असेल. आपल्या या भावी वाटचालीकरिता सर्वप्रथम आपणांस फेडरेशनचा अध्यक्ष या नात्याने शुभेच्छा देतो. करोनाच्या काळात बंद झालेले वार्तापत्र परत एकदा आपण सुरू करत आहोत.

फेडरेशनच्या उपक्रमानुसार रिझर्व्ह बँकेची परिपत्रके तसेच राज्य शासन, सहकार आयुक्त कार्यालय तथा इंडियन बँक्स् असोसिएशनने जारी केलेली परिपत्रके आपणाकडे वेळोवेळी पाठवली जात होतीच. यावेळी काही बँकांच्या यशोगाथा देखील नागरी सहकारी बँक वार्तापत्राच्या माध्यमातून आम्ही वाचकांसमोर आणणार आहोत.

त्याचप्रमाणे फेडरेशनतर्फे सभासद बँकांच्या बाजूने रिझर्व्ह बँकेच्या टॅफकब समितीसमोर त्यांची बाजू भक्कमपणे मांडली जातेच व त्यानुषंगाने रिझर्व्ह बँकेने या बँकावरील आपली बंधने शिथिल केलेली असतील वा काढून टाकलेली असतील, तर अशा बाबींचीही माहिती वार्तापत्राद्वारे सादर केली जाईल.

सभासद बँकांच्या हितासाठी फेडरेशनच्या संचालक मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाची देखील अंकात प्रसिद्धी दिली जाईल, जेणेकरुन फेडरेशनच्या कार्याची माहिती सभासद बँकांना मिळू शकेल. तसेच ज्या सभासद बँकांना आपले उपक्रम किंवा त्यांनी केलेली व्यवसायवृद्धी अथवा आखलेली धोरणे, त्यावर घेतलेले निर्णय इ. ची माहिती प्रसिद्ध करावयाची असल्यास नागरी बँक वार्तापत्रात जाहिरातीद्वारे प्रकाशित करता येतील.

आपणांस कल्पना आहेच की, कोव्हीड काळानंतर सर्व बँकांच्या प्रामुख्याने नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम, एन.पी.ए. चे वाढत चाललेले प्रमाण, त्यामुळे लागलेली रिझर्व्ह बँकेची बंधने, उच्च तंत्रज्ञानाच्या अभावी निर्माण होणारे धोके/हल्ले, नवीन आधुनिकीकरणाची भासत असलेली गरज, बँकांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणी, बँका-बँकांमधील गळचेपी स्पर्धा, ठेव संकलन व कर्ज वितरण यावर असलेल्या मर्यादा या सर्व बाबींचा विचार करता आपल्या बँकांना यापुढे अतिशय कार्यक्षमतेने तसेच कार्यतत्परतेने कामकाज करावे लागणार आहे.

आपल्या बँकांना भेडसावणारे अनेक प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्यासाठी फेडरेशन कायम कटिबद्ध आहे.

या आपल्या कामकाजास आपल्या फेडरेशनच्यावतीने आम्हास जेवढे सहकार्य करता येईल ते आम्ही करत राहू. तसेच फेडरेशनने ज्या ज्या बाबी सभासद बँकांच्या हितासाठी करणे आवश्यक आहेत त्या सर्व बाबी पार पाडण्याचे आश्वासन मी फेडरेशनच्यावतीने आपणांस देऊ इच्छितो व सरतेशेवटी आगामी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मी संचालक मंडळाच्या वतीने सर्व सभासद बँकांना शुभेच्छा देतो.

*****